महाराष्ट्र शासन
कुंभमेळा आयुक्त यांचे कार्यालय, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण
जुनी जिल्हा परिषद भवन, त्र्यंबक नाका, नाशिक - 422001
दुरध्वनी क्र. 0253-2977374 Email- mahakumbhanashik@gmail.com

जा.क्र.नात्र्यंकुंप्रा/ ऑक्टोंबर -इतिवृत्त/2026 दि.स्वाक्षरीखाली नमूद

प्रति,

1 मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर.
2 मा.महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
3 मा.आयुक्त, महानगरपालिका, नाशिक.
4 मा.जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.
5 मा.पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण.
6 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.
7 मा.सह आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
8 मा.विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक.
9 मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक.
10 मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
11 मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक.
12 मा.अधिक्षक अभियंता (लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, नाशिक.
13 मा.अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कं. मर्या., नाशिक शहर/ ग्रामीण.
14 मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रक मंडळ नाशिक
15 मा.सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक
16 मा.सह संचालक, नगररचना, नाशिक विभाग.
17 मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि.नाशिक
18 मा.कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक.
19 मा.कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग नाशिक
20 मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, नाशिक.
21 मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर, दक्षिण व पुर्व) नाशिक
22 मा.सहायक संचालक, महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, नाशिक.
23 मा.शहर अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका
24 मा.मुख्यधिकारी, त्र्यंबक नगरपरिषद
25 मा.रेल्वे मंडळाचे प्रतिनिधी.
26 मा.कार्यासन अधिकारी, ना.त्र्यं.कुं.मे.प्रा.कार्यालय, नाशिक
27 व इतर सर्व संबंधीत अधिकारी / यंत्रणा

विषय : नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे दि.21/10/2026 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक दि.21 ऑक्टोंबर 2026 रोजी मा.अध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आहे.

सदर बैठकीचे इतिवृत्त या सोबत पाठविण्यात येत असून इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाशी संबंधित सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

आपला विश्वासु

Digitally signed by
Yogendra Ashok Chaudhari
Date: 26-10-2026 18:34:16

(योगेंद्र चौधरी)
उपायुक्त (नियोजन)
नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण.
नाशिक

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर..

१) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.विशेष पोलीस महानिरिक्षक, नाशिक परिक्षेत्र.
२) मा.उपाध्यक्ष, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण तथा मा.जिल्हाधिकारी, नाशिक

नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ महाकुंभमेळा प्राधिकरणाच्या दि.२१/१०/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

दि. २१/१०/२०२६ रोजी मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची आढावा बैठक व्ही.सी. / ऑनलाईन द्वारे घेण्यात आली. बैठकीतील उपस्थितांची यादी सोबत संलग्न आहे.

कुंभमेळा आयुक्त तथा सदस्य सचिव श्री. शेखर सिंह यांनी सर्व प्राधिकरण सदस्यांचे स्वागत केले. मा.अध्यक्ष यांनी नमूद केले की, यापुर्वी सूचना केल्याप्रमाणे प्रत्येक काम प्रस्तावित करण्यापूर्वी कामाची निकड असल्याची खात्री करावी आवश्यक प्रशासकीय आणि वित्तीय पूर्तता झाल्याची खात्री करावी आणि आणि कामांचे व्दिरुक्ती (Duplication) होणार नाही याचीही खात्री करणे आवश्यक असल्याची बाब पुनश्च: निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार खात्री झाल्याचे कुंभमेळा आयुक्त यांनी सांगितले.

बैठकीच्या सुरुवातीला प्राधिकरणाच्या मागील दि.१०/१०/२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. त्यानंतर अजेंड्यावरील नमूद केलेल्या विषयांवर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

शिखर समितीची मान्यता असलेले विषय

विषय क्र. १ - महाराष्ट्र शासन, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, यांना राज्य स्तरावरुन प्रचार व प्रसिद्धी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

- चर्चा व निर्णय: सिंहस्थ कुंभमेळा-२०२७ चे ध्वजारोहण दि. ३१ ऑक्टोबर, २०२६ रोजी पार पडणार आहे. या अनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्यामार्फत राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया (आकाशवाणी, दूरदर्शन, एफ एम, न्यूज चॅनेल्स), बाह्य माध्यम (होर्डिंग्ज, एलईडी, विमानतळ/रेल्वे स्थानक डिस्पले), बीटीएल □क्टिव्हिटी, चित्ररथ, समाजमाध्यमे व नवमाध्यमांद्वारे प्रचार-प्रसिद्धीचे व्यापक नियोजन करण्यात आले असल्याची यंत्रणेकडून माहिती सादर करण्यात आली.
- या उपक्रमांच्या अंमलबजावणीचा टप्पा दि. २१ ते ३१ ऑक्टोबर, २०२६ (एकूण १२ दिवस) असा राहील. प्रचार प्रसिद्धी करताना खाजगी होर्डिंग्जबाबत आवश्यक त्या परवानग्या महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वेळेत प्राप्त करून घेण्याची दक्षता या कामाकरीता निश्चित करण्यात आलेल्या अंमलबजावणी यंत्रणेने -जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक यांनी घ्यावी. तसेच प्रचार प्रसिध्दीबाबत शासनाकडून निर्गमित सर्व सूचनांचे व दि.12.10.2026 रोजी माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयांचे पालन करुन पुढील कार्यवाही करण्यात यावी अशा सुचना देण्यात आल्या.

- निर्णय: प्रचलित शासकीय नियमांनुसार व विहित निविदा प्रक्रिया पार पाडण्याच्या अटीवर, प्रस्तावित सर्व बाबींच्या अंदाजित रक्कम रुपये १४.०० कोटी अधिक जीएसटीसह एकूण १६.०० कोटी रुपये मात्र खर्चाच्या प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

विषय क्र. २ - जिल्हा माहिती कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रचार व प्रसिद्धी करीता आवश्यक पायाभूत सुविधा, साधनसामग्री आणि जाहिरात व प्रसिद्धी करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

- चर्चा व निर्णय: जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक मार्फत सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारी व पर्वणी काळात व्यापक प्रसिद्धीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा (उदा. रामकुंड, कुशावर्त येथे मीडिया गॅलरी, टॉवर्स व पत्राचे शेड उभारणे, व्हीव्हीआयपी अतिथी व पत्रकार भोजन/वाहतूक खर्च), साधनसामग्री (व्हिडीओ कॅमेरे, ३ मीडिया सेंटर्ससाठी संगणक, प्रिंटर, टॅब, टेलिव्हिजन खरेदी) आणि जाहिरात व प्रसिद्धी (दूरदर्शन, स्थानिक केबल, बसेसवर संदेश, वृत्तपत्र जाहिराती) या आराखड्याचा आढावा घेण्यात आला.
- तांत्रिक बाबींवर चर्चा करताना नमूद करण्यात आले की, सदर प्रस्तावास अद्याप तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली नाही. तसेच, शिखर समितीने या उपक्रमासाठी रक्कम रु.२०.०० कोटीच्या मर्यादेत

मान्यता दिलेली आहे. बाह्य प्रसिद्धी व होर्डिंग्ज उभारणीसाठी पोलीस विभाग, महापालिका, पीडब्ल्यूडी व इतर संबंधित सक्षम प्राधिकरणांकडून पूर्वपरवानग्या व ना-हरकत प्रमाणपत्रे तातडीने मिळवण्यासाठी नोडल अधिकाऱ्यांमार्फत आवश्यक समन्वय साधण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या.

- निर्णय: जिल्हा माहिती कार्यालयाने सादर केलेल्या एकूण रु. ४३.०० कोटी (पायाभूत सुविधा- रु.१०.१५ कोटी, साधनसामग्री- रु.०२.४५ कोटी, जाहिरात व प्रसिद्धी- रु.३०.४० कोटी) च्या प्रस्तावास, सक्षम यंत्रणेची तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेण्याच्या आणि शिखर समितीने घालून दिलेल्या रु. २०.०० कोटीच्या वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून प्रत्यक्ष खर्च करण्याच्या अटीवर प्राधिकरणाने सर्वानुमते मान्यता दिली.

विषय क्र. ३ - IIT Bombay या संस्थेस अदा करावयाच्या मानधनाच्या रकमेत सुधारित प्रकल्प किंमतीनुसार वाढ करण्यास मान्यता मिळणेबाबत.

- चर्चा व निर्णय: नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या दि.०८ मे २०२६ रोजीच्या बैठकीत IIT Bombay या संस्थेस रु. १,००० कोटींच्या कामांच्या व्याप्तीनुसार प्रकल्प रकमेच्या ०.३९% दराने रु. ३.९० कोटी मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती. सामंजस्य करार (MoU) करताना कामाची अंतिम किंमत निश्चित नव्हती. आता कामाची सुधारित किंमत निश्चित झाली असून प्रकल्प किंमतीत रु. १७५/- कोटींची वाढ झाली आहे.
- मान्य दरानुसार (०.३९%) संस्थेस एकूण रु. ४.५९ कोटी (अंदाजे) मानधन देय होत असून, पूर्वी मंजूर रु. ३.९० कोटी वजा जाता अतिरिक्त मानधनाची पुनर्गणना करण्यात आली आहे. कामाच्या गुणवत्तेच्या दृष्टीने सदर तांत्रिक पडताळणी आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.
- निर्णय: प्रकल्प व्याप्ती वाढीमुळे देय होणाऱ्या अतिरिक्त रक्कम रु. ६९ लक्ष मात्र + GST इतके मानधन IIT Bombay संस्थेस अदा करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाने सर्वानुमते प्रशासकीय मान्यता दिली.

कुंभमेळा आयुक्त यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त केली.

Digitally signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 22-10-2026 14:42:12

(डॉ. प्रवीण गेडाम)
अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण
तथा विभागीय आयुक्त, नाशिक.

दि.२१ ऑक्टोंबर २०२६ रोजीचे बैठकीस उपस्थितांची यादी

निमंत्रित यंत्रणा :-

१. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
२. आयुक्त, नाशिक महानगरपालिका.
३. जिल्हाधिकारी, नाशिक
४. जिल्हाधिकारी अहिल्यानगर.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
६. सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक.
७. विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्गपरिवहन महामंडळ (एसटी) नाशिक विभाग
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
९. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक
१०. अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.
११. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी नाशिक
१२. सह संचालक, लेखा व कोषागारे, नाशिक.
१३. रेल्वे मंडळाने नामनिर्देशित केलेले प्रतिनिधी.

इतर- निमंत्रित यंत्रणा / व्यक्ती :-

१) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय.
२) जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक